स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्या शाखा, विधी व सामाजिक शास्त्रे विद्या शाखे अंतर्गत
इतिहास विषयातील विद्या वाचस्पती पदवी मिळवण्यासाठी सादर
करावयाचा संशोधन आराखडा

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्हयातील स्त्रियांचे योगदान (1920 - 1947)

संशोधन केंद्र - इतिहास

पानसरे महाविद्यालय अर्जापूर ता. बिलोली जि. नांदेड

संशोधक

विद्या युवराज कापसे
एम. ए., बी. एड.
मु. पो. वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली
मो. नं. 8308375833
Email - bhosalevidya68@gmail.com

मार्गदर्शक

डॉ. सुरेश अ. कातळे
(एम. ए., एम. फिल., पीएच. डी. (इतिहास))
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
शहिद भगतसिह महाविद्यालय, किल्लारी
ता. औसा जि. लातूर
मो. न. 8329003076

वर्ष 2023

अनुक्रमणिका

अ. न.	तपशिल	पान नं.
1	प्रस्तावना	3
2	विषय निवडीचे महत्व	4
3	विषयाचे स्वरूप	5
4	विषयाची व्याप्ती	5
5	संशोधनाची उद्दिष्टे	6
6	संशोधनाची गृहीतके	6
7	संशोधन समस्या	7
8	संशोधन क्षेत्र	7
9	संशोधन पद्धती	7
10	पूर्व संशोधनाचा आढावा	7
11	प्रकरण निहाय रचना	11
12	संदर्भसूची	14

1.प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्यलढा हे आधुनिक युगातले एक धगधगते पर्व आहे. या लढ्यात नवचैतन्य निर्माण करणारे राज्य म्हणजे महाराष्ट्र. सहयाद्री पर्वत रांगात स्थित असणाऱ्या महाराष्ट्रातील जनता ही चिवट, प्रामाणिक, धाडसी आहे. स्वातंत्र्याचे बाळकडू हे इथल्या मातीत शिवरायांनी उतरवले आहे. भारतीय स्वातंत्र्य संग्रामात पुरुषांबरोबर स्त्रियांनी सुद्धा सहभाग घेतला असून त्यांचा सहभाग हा उत्स्फूर्त व उत्साही होता. महात्मा गांधीजींच्या आगमनामुळे स्वातंत्र्य लढ्यात चैतन्य निर्माण झाले. स्वातंत्र्य प्राप्तीची अहिंसा व सत्याग्रह ही दोन शस्त्रे होती.

या स्वातंत्र्य चळवळीत सातारा जिल्हयाने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीच्या पूर्वी सातारा जिल्हा हा प्राचीन काळातील सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, वाकाटक यांच्या साम्राज्यांमध्ये येत होता तर मध्ययुगात काही काळ मोगल आणि आदिलशाही प्रदेशात याचा समावेश होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखान वधानंतर स्वराज्याच्या सीमा मिरज पर्यंत वृद्धिंगत केल्या. छत्रपती शाहू महाराजांनी स्वराज्याची चौथी राजधानी म्हणून सातारा येथे स्थापन केली. 1857 च्या उठावात महिलांचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी सैनिकांना व क्रांतिकारकांना पाठिंबा देण्याचे कार्य या संस्थानातील महिलांनी केले. शिक्षण, साहित्य, कला, क्रीडा क्षेत्रात पूर्वीपासूनच या जिल्हयाने वेगळा ठसा उमटवला आहे. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आणि चलेजावा आंदोलन यामध्ये उत्स्फूर्त व उत्साह पूर्व सहभाग या जिल्हयाने घेतला. प्रतिसरकारच्या माध्यमातून क्रांतिसिंह नाना पाटलांनी इंग्रजांसमोर एक आव्हान उभे केले होते. खेड्यापाड्यातील डोंगर वस्तीतील सर्व जनतेने या स्वातंत्र्य चळवळीत उस्फुर्त सहभाग घेतला. पुरुषांबरोबर स्त्रियांनी सुद्धा पराक्रम आणि धाडस दाखवले हा जिल्हा शूरवीरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो.

1ऑक्टोबर 1949 ला सातारा जिल्हयाची निर्मिती झाली. 1960 पर्यंत या जिल्हयाच्या उत्तर भागाला उत्तर सातारा म्हणजेच (सध्याचा सातारा जिल्हा) तर दक्षिण भागाला दक्षिण

सातारा (सध्याचा सांगली जिल्हा) म्हणून ओळखले जात होते. 1960 नंतर या जिल्ह्याचे नव्याने विभाजन झाले. उत्तर साताऱ्याला सातारा जिल्हा व दक्षिण साताऱ्याला सांगली जिल्हा असे नामकरण करण्यात आले. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात ग्रामीण भागातील स्त्रियांनीही पुरुषांबरोबरच सहभाग घेतला. यामध्ये इंदुताई पाटणकर, लक्ष्मीबाई नाईकवडी, कळंत्रे अक्का इत्यादींसारख्या स्त्रिया ग्रामीण भागातील स्त्रियांचा आदर्श बनल्या. भूमिगतांना अन्नाची रसद पुरविणे, संदेशवहन या गुप्त स्वरूपाच्या कामाव्यतिरिक्त अनेक धाडसी आंदोलने, निदर्शने, उपोषणे यामध्ये स्त्रिया सहभागी होत्या . स्वातंत्र्य चळवळी बरोबर प्रतिसरकारच्या माध्यमातून सत्यशोधकी कार्य, दारूबंदी, साक्षरता, न्यायदान या स्त्रियांचा सहभाग महत्त्वाचा ठरला आहे. स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांची योगदान हे समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न या शोध प्रबंधातून करणार आहे.

2.संशोधनाची आवश्यकता, विषय निवडीचे महत्त्व –

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सातारा जिल्ह्याने दिलेल्या स्वातंत्र्यलढ्याला महत्त्वाचे स्थान आहे. सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढ्याचे प्रदीर्घ असे परिणाम झालेले दिसून येतात. प्रामुख्याने स्त्रिया व तळागाळातील लोक या लढ्यात सामील झाले होते. या स्वातंत्र्यलढ्याचे स्वरूप बदलत गेले तरी इथल्या स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यात दाखविलेले शौर्य व धाडस अभूतपूर्व आहे. स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांनी दिलेले योगदान समजावून घेणे नव्या पिढीसाठी आवश्यक आहे. स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने ते गरजेचे आहे. हा वैभवशाली वारसा जपणे नव्या तरुणांना प्रेरणा, मार्गदर्शन व देश प्रेम जागृत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे . स्वातंत्र्यलढ्यात अनेक विचार प्रवाह होते त्यामध्ये गांधीवादी, समाजवादी, क्रांतिकारी असे भाग असून त्या प्रत्येक विचार प्रवाहात स्त्रियांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी केलेला त्याग, त्यांची सहनशीलता आणि दाखविलेले धाडस हे अतुलनीय आहे. आजच्या पिढीला त्यातून प्रेरणा घेता येईल आणि देशप्रेम जागृत होईल म्हणून प्रस्तुत विषयाची निवड संशोधनासाठी केलेली आहे.

3. विषयाची व्याप्ती

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांनी दिलेले योगदान महत्वपूर्ण आहे. त्यांनी दिलेल्या लढ्याद्वारे स्त्रियांचे समाजातील स्थान तसेच शिक्षण, राजकारण, उद्योग, आर्थिक इत्यादी क्षेत्रात बदल घडून आले. या सर्व बाबींचा अभ्यास प्रस्तुत शोध प्रबंधात करणार आहे.

4. विषयाचे स्वरूप

सातारा जिल्हा महाराष्ट्रातील पश्चिम विभागातील एक जिल्हा आहे. 1960 पूर्वी सध्याचा सांगली जिल्हा व सातारा जिल्हा मिळवून सातारा जिल्हा मानला जात होता. दक्षिण व उत्तर सातारा म्हणून त्याचे भाग पडले होते. सह्याद्रीच्या उंच पर्वतरांगा, शिखरे, विस्तीर्ण पठारे, कृष्णा, कोयना या मुख्य नद्यांनी युक्त असणारा सातारा जिल्हा क्रांतिकारकांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सातारा जिल्ह्याने महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली असून प्रतिसरकारच्या स्थापनेत तर या जिल्ह्याने स्वातंत्र्यसंग्रामात आपली वेगळी ओळख निर्माण केली. क्रांतिसिंह नाना पाटील, यशवंतराव चव्हाण आदी नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वातंत्र्य लढ्यात चैतन्य निर्माण झाले. असहकार चळवळ, सविनय कायदेभंग आणि चलेजाव आंदोलनानंतर जिल्ह्यातील जनतेने ब्रिटिश सरकार विरुद्धचा दिलेला लढा मार्गदर्शक स्वरूपाचा आहे. चले जाव चळवळीमुळे सातारा जिल्ह्यातील ग्रामीण भागात सुद्धा स्वातंत्र्य विषयी जागरूकता निर्माण झाली. स्त्रियांनी सुद्धा या लढ्यात सहभाग घेतला. भूमिगतांना सहकार्य करणे, क्रांतिकारकांचे संदेश पोहोचविणे, प्रशिक्षण शिबिर चालवणे, प्रसंगी शस्त्र हातात घेऊन सरकारशी दोन हात करणे त्यामुळे सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढ्याला एक वेगळेपण प्राप्त झाले आहे. प्रस्तुत संशोधनात सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळीत स्त्रियांच्या योगदानाबद्दल आढावा घेतला जाणार आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात सातारा जिल्ह्याने दिलेल्या स्वातंत्र्य लढ्याला महत्त्वाचे स्थान आहे. सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढ्याचे प्रदीर्घ असे परिणाम

झालेले दिसून येतात. तळागाळातील लोक या लढ्यात सामील झालेले दिसून येतात. या स्वातंत्र्य लढ्याचे स्वरूप बदलत गेले तरी इथल्या स्त्रियांनी दाखविलेले धाडस अभूतपूर्व आहे. स्वातंत्र्य लढ्यात स्त्रियांनी दिलेले योगदान समजून घेणे, नव्या पिढीसाठी आवश्यक आहे. स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने ते गरजेचे आहे. हा वैभवशाली वारसा जपणे नव्या तरुणांना प्रेरणा, मार्गदर्शन व देश प्रेम जागृत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे .

स्वातंत्र्यलढ्यात अनेक विचार प्रवाह होते. त्यामध्ये गांधीवादी, समाजवादी, क्रांतिकारी यांचा उल्लेख प्रामुख्याने केला जातो. स्त्रियांचे योगदान त्याप्रवाहात महत्त्वपूर्ण आहे. त्यांची सहनशीलता आणि त्यांनी दाखविलेले धाडस हे अतुलनिय आहे. आजच्या पिढीला त्यातून प्रेरणा घेता येईल, देशप्रेम जागृत होईल.

5. संशोधनाची उद्‌दिष्टे

1) सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य चळवळ अभ्यासणे.
2) स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी पुरुषांच्या बरोबरीत आपली कर्तव्ये, क्षमता सिद्‌ध केली याचा अभ्यास करणे.
3) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांचा सहभाग व योगदान अभ्यासणे.
4) स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा मोठ्या संख्येने सहभाग वाढवण्यासाठी महात्मा गांधींची प्रेरणा कारणीभूत ठरली याचा शोध घेणे.
5) सातारा जिल्ह्यातील समाजवादी स्त्रियांचा इतिहास अभ्यासणे.
6) सातारा जिल्ह्यातील क्रांतिकारी स्त्रियांचा इतिहास अभ्यासणे.

6. गृहीतके

1) स्वातंत्र्य चळवळीतील स्त्रियांच्या सक्रिय सहभागामुळे स्त्रीया मधील राजकीय व सामाजिक जाणीवा जागृत झाल्या.
2) स्वातंत्र्य चळवळीत महिलांनी पुरुषांबरोबर कार्य करून कर्तृत्व क्षमता सिद्‌ध केली.

3) महिलांचा आत्मविश्वास नेतृत्व गुण विकसित होण्यास मदत झाली

4) महिला सक्षमीकरणाची पायाभरणी स्वातंत्र्य चळवळीतील महिलांच्या सक्रिय सहभागामुळे झाली.

5) प्रतिसरकारच्या लढ्यात स्त्रियांनी घेतलेल्या सहभागामुळे प्रतिसरकार विषयी लोकांच्या मनात आदर निर्माण झाला.

6) स्वातंत्र्य चळवळीमुळे गांधीवाद, समाजवाद घरा-घरात रुजल्यामुळे स्त्रियांना वैचारिक स्वातंत्र्य मिळाले.

7. संशोधन समस्या -

स्वातंत्र्य चळवळीतील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे योगदान याचा अभ्यास ऐतिहासिक पद्धतीने झालेला नाही हे सदर संशोधनाची उणीव आहे.

8. संशोधन क्षेत्र -

सदर संशोधन प्रबंधामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेत असताना 1920 ते 1947 पर्यंतच्या स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचे योगदान याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

9. संशोधन पद्धती -

प्रस्तुत विषयाची मांडणी करताना प्रामुख्याने संशोधन पद्धतीमध्ये निष्कर्ष काढता यावेत यासाठी संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्याचबरोबर संदर्भ पद्धत, मुलाखत या पद्धतीचा वापर करून सदरचे संशोधन पूर्ण केले जाईल. यात प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

10. पूर्व संशोधनाचा आढावा

प्रस्तुत शोध प्रबंधाच्या विषयासंदर्भात प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साहित्य साधने प्राप्त करून संशोधन काटेकोर पद्धतीने केले जाईल. तसेच मानव्यशास्त्राच्या इतर ज्ञानशाखामध्ये उपलब्ध असलेल्या साधनांचा आढावा घेणे, विषयाच्या विविध घटकांच्या आकलनासाठी उपयोगी ठरेल.

1. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया

नवाज मोदी यांनी संपादित केलेला व वासंती फडके यांनी अनुवादित केलेला हा ग्रंथ असून या ग्रंथामध्ये चार विभागात माहितीचे विश्लेषण केले आहे. पहिल्या सत्रात क्रांतिकारक स्त्रियांचे स्वातंत्र्य चळवळीत योगदान, दुसऱ्या विभागात महात्मा गांधीबरोबर त्यांच्या विविध उपक्रमात व चळवळीत कार्य करणाऱ्या स्त्रियांची भूमिका स्पष्ट केली आहे. याचा प्रस्तुत संशोधनात संदर्भ घेण्यात येणार आहे. क्रांतिकारी स्त्रिया या प्रकरणात क्रांतिकारी स्त्रियांच्या दुःखाची व कष्टाची माहिती स्पष्ट केली असून या ग्रंथात कष्टकरी स्त्रिया उच्च वर्गातील स्त्रिया यांनी दिलेले स्वातंत्र्य लढ्यातील योगदान स्पष्ट होते. हा ग्रंथ शोध प्रबंधात दुय्यम साधन म्हणून वापरण्यात येणार आहे.

2. आधुनिक भारताचा इतिहास (1994)

डॉ. सुमन वैद्य व डॉ. शांता कोठेकर यांच्या या ग्रंथात 19 प्रकरणे असून पहिला प्रकरणात स्वातंत्र्य आंदोलनाचे पर्व तसेच असहकार चळवळ याचा आढावा घेण्यात आला असून यातून तत्कालीन सातारा जिल्ह्याची परिस्थिती समजून येते. दुसऱ्या प्रकरणात सविनय कायदेभंग चळवळीत सहभागी झालेला ग्रामीण समाज त्यांचे आंदोलने आणि स्त्रिया याचा सखोल अभ्यास केला आहे. तसेच शिक्षण व सामाजिक सुधारणा या प्रकरणात भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रियांचे स्थान त्यांच्या सामाजिक बदलास कारणीभूत ठरलेल्या घटकांची चर्चा केली आहे. स्त्रियांनी घेतलेला सामाजिक पुढाकार मद्यपान बंदी ,शिक्षण, बालकामगार, साक्षरता यासारख्या समाज उपयोगी कार्यक्रमात स्त्रियांचा वाढता सहभाग सांगितला आहे.

3. आधुनिक भारताचा इतिहास (1761-1971)

डॉ. वीरेंद्र गोपाल सिंह बैस यांचा हा ग्रंथ 2012 साली प्रकाशित झाला असून यामध्ये 17 प्रकरणे आहेत. पहिल्या दोन प्रकरणात भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना व भारतातील ब्रिटिशांनी केलेल्या अंतर्गत सुधारणा स्त्रियांना दिलासा देणारे कायदे स्पष्ट केले आहेत. प्रकरण चार, पाच, सहा मध्ये 1857 चा उठाव लॉर्ड कर्झन याची दडपशाही विशद केली आहे. प्रकरण 7 ते 12 या

प्रकरणात भारतीयांनी ब्रिटिशाविरुद्ध दिलेला लढा विशद केला आहे. पुरुषांबरोबर महिलांनीही या स्वातंत्र्य चळवळी सहभाग घेतला हे दिसून येते. यामध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीत आलेले चैतन्य स्पष्ट केले आहे.

4. भारतीय इतिहासातील स्त्रिया

डॉ. सौ. पद्मजा पाटील व डॉ. शोभना जाधव यांचा हा लिखित ग्रंथ असून यात दहा प्रकरणांचा समावेश आहे. एक ते तीन या प्रकरणात शिव काळापासून 1857 च्या उठावापर्यंत शोषणाविरुद्ध दिलेला लढा आहे. चार ते पाच या प्रकरणात सामाजिक शोषणाविरुद्ध महिलांनी दिलेला लढा विशद केला आहे. प्रकरण सहा ते आठ मध्ये भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांनी दिलेले योगदान विशद केले आहे. प्रकरण नऊ ते दहा मध्ये भारतीय प्रशासनात स्त्रियांचा प्रभाव विशद केला आहे. या ग्रंथातून स्त्रियांनी दिलेल्या अन्यायाविरुद्ध शोषणाविरुद्ध लढा स्पष्ट केला आहे. त्यामुळे झालेले सामाजिक बदल विशद केले आहेत. या बदलाला कारणीभूत ठरलेले घटक विशद केले आहेत. म्हणून भारतीय स्त्रियांचा देदीप्यमान इतिहास समजण्यास मदत होते.

5. हिंदुस्तानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास

डॉ. जयसिंगराव पवार यांच्या ग्रंथात 18 प्रकरण आहेत. प्रकरण एक व दोन मध्ये भारतात इंग्रजी सत्तेचा पाया कसा रचला गेला याचे विवेचन केले आहे. इंग्रजांनी इथे राज्य स्थापन करीत असताना न्याय, अन्यायाचा नीती अनीतीचा फारसा विचार केला नाही. परिणामी एक प्रचंड असंतोष हिंदी समाजात उत्पन्न झाला होता. या असंतोषाचा स्फोट 1857 साली उठावाच्या रूपाने झाला याचे विवेचन केले आहे. प्रकरण तीन ते दहा मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना सरकारची दडपशाही मोर्ले मिंटो सुधारणा, लोकमान्य टिळकांचे कार्य विशद केले आहे. प्रकरण दहा ते अठरा मध्ये गांधीजींच्या नेतृत्वाखाली भारतीयांनी इंग्रजा विरुद्ध दिलेला लढा विशद केला आहे. अशा प्रकारे प्रस्तुत विषय म्हणजे हिंदुस्तानच्या एकेकाळच्या राजकीय गुलामगिरीचा आणि मुक्त होण्यासाठी आपल्या पूर्वजांनी केलेल्या संघर्षांचा इतिहास आहे

कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य हा त्या देशाचा फार मोठा अनमोल ठेवा असतो हा ठेवा सुरक्षित व चिरंतन रहावा असे स्पष्ट केले आहे.

6. Struggle for Freedom

आर. सी. मुजुमदार यांच्या ग्रंथात भारतीय स्वातंत्र्य चळवळीची सखोल व सविस्तर मांडणी केली असून शहरी वर्गापासून ग्रामीण वर्गापर्यंत स्वातंत्र्य चळवळीचा प्रसार कसा होत गेला याचे विस्तृत विवेचन केले आहे. 1885 ते 1920 च्या कालखंडात स्वातंत्र्य चळवळीचे विचारधारा व ब्रिटिशांबरोबर होणारा संघर्ष जनतेने न्याय मागण्यासाठी चालवलेली आंदोलने इंग्रजांची दडपशाही जुलमी कायदे वर्णभेद याचा जनतेच्या सामाजिक आर्थिक जीवनावर पडलेला प्रभाव यात स्पष्ट केला आहे. इसवी सन 1920 ते 1947 पर्यंत भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा गांधी विचारणीने झालेला प्रचार सुशिक्षित व धाडसी तरुणांचे नेतृत्व यामुळे स्वातंत्र्य या शब्दाला सामाजिक अधिष्ठान प्राप्त झाले. वृद्ध तरुण महिला यांचे वैचारिक सक्षमीकरण करून सामाजिक बदल झाला याचे विस्तृत विवेचन या ग्रंथांमध्ये केले आहे.

7. Indian struggle for independence (1857 to 1947)

बिपिन चंद्र यांच्या या ग्रंथात भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या स्वरूपाचे टप्पे विशद केले आहेत. मवाळगट, गांधीवादी समाजवादी क्रांतिकारी प्रत्येक गटाचे वैचारिक प्रभाव भिन्न होते तरी ध्येय मात्र एक होते. आणि साम्राज्यवादी धोरणाला राष्ट्रवादाने केलेला विरोध आणि भारतीयांच्यात निर्माण झालेला राष्ट्रवाद घोषित केलेला आहे. नव्या पिढीला भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास माहीत असणे राष्ट्रीय भावना दृढ होण्याच्या दृष्टीने अगत्याचे आहे तसेच स्वातंत्र्य भारतापुढील समस्या त्यांचे निराकरण करण्याचे होत असलेले प्रयत्न राजकारणाचे स्वरूप आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रगतीला झालेले सुरुवात या ग्रंथात विशद केली आहे. महिलांच्या सामाजिक शैक्षणिक उन्नतीला झालेली सुरुवात या ग्रंथात विशद केली आहे. अल्पसंख्यांक गटांना दिलेले लढे भारतीय स्वातंत्र्य चळवळी साठी कसे महत्त्वाचे होते हे या ग्रंथात स्पष्ट केले आहे.

11. प्रकरण निहाय रचना

1) प्रस्तावना व संशोधन पद्धती
2) सातारा जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी.
3) असहकार चळवळ व सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सातारा जिल्ह्यातील स्त्रियांची भूमिका
4) 1942 च्या चलेजाव आंदोलनातील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग
5) प्रतिसरकार मधील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे कार्य
6) सातारा जिल्ह्यातील गांधीवादी व समाजवादी स्त्रियांचे नेतृत्व
7) उपसंहार व निष्कर्ष

11.1) प्रस्तावना व संशोधन पद्धती

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत अनेकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली आहे. स्वातंत्र्य हा मानवाचा स्थायीभाव असून स्वातंत्र्यासाठी लढणे हा त्याचा स्वभाव होता. मग तो पुरुष असो अथवा स्त्री असो. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत पुरुषांबरोबर स्त्रियांचा सुद्धा तितकाच महत्त्वाचा वाटा होता. प्राचीन भारतीय संस्कृतीत स्त्रीला सन्मानाची वागणूक होती. वेदोत्तर काळानंतर स्त्रीला दुय्यम दर्जा प्राप्त झाला. सातवाहन सत्ता सोडली तर कोणत्याही राजकीय सत्तेने स्त्रियांना सन्मानाची वागणूक दिली नाही. पेशवाई कालखंडात स्त्रियांची मानसिक व शारीरिक कुचंबना केली गेली. जाचक प्रथा, रुढी, परंपरा यामध्ये स्त्री भरडली गेली. पाश्चिमात्यांच्या आगमनानंतर त्यांचा शैक्षणिक व सांस्कृतिक प्रभाव भारतीय समाजावर पडला आणि समाज सुधारकांनी स्त्री सक्षमीकरणाला सुरुवात केली. प्रत्येक गोष्टीत स्त्री-पुरुषांबरोबर कर्तृत्व सिद्ध करू शकते याची जाणीव भारतीय स्त्रियांना झाली. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांनी दिलेले योगदान प्रस्तुत शोध प्रबंधात मांडण्यात येणार आहे. त्यानुसार विषयाची व्याप्ती ठरवण्यात आली असून विषयांनारूप परिकल्पना साध्य करण्यासाठी

संशोधनाची उद्दिष्टे ठरवण्यात आले आहेत. संशोधन क्षेत्र निश्चित असून संशोधन समस्या अनुरूप संशोधन पद्धती ठरविणार आहे. पूर्व संशोधनाचा आढावा घेऊन प्रकरणाची रचना केली जाईल वरील सर्व बाबींचा या प्रकरणात समावेश करण्यात येणार आहे.

11.2) सातारा जिल्हयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्रातील सातारा जिल्हा हा शूरवीरांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. प्राचीन काळापासून सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, यादव यांची राज्ये असणारा हा प्रदेश होता. सह्याद्रीच्या पर्वतरांगा कृष्णा, कोयना या मुख्य नद्यामुळे या प्रदेशास महत्त्व प्राप्त झाले. पशुपालन कृषी हा मुख्य व्यवसाय येथील लोकांचा होता. मध्ययुगीन काळात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यात हा प्रदेश आला. त्यानंतर 1773 ला छत्रपती शाहू महाराजांनी मराठ्यांची चौथी राजधानी म्हणून साताऱ्याला घोषित केले. अनेक मातब्बर सरदार या प्रदेशात होऊन गेले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वपूर्ण योगदान या जिल्हयाने दिले. पुरुषांच्या बरोबर स्त्रियांनी सुद्धा स्वातंत्र्य संग्रामात सहभाग घेतला आहे याचा थोडक्यात मागोवा या प्रकरणात मांडणार आहे.

11. 3) असहकार चळवळ व सविनय कायदेभंग चळवळीमध्ये सातारा जिल्हयातील स्त्रियांची भूमिका

10 एप्रिल 1930 ला प्रसिद्ध झालेल्या' यंग इंडिया' च्या अंकात गांधीजींनी महिलांना उद्देशून केलेल्या आव्हानाला हजारो स्त्रियांनी प्रतिसाद दिला आणि भारताचे स्वातंत्र्य आंदोलन खऱ्या अर्थाने जन आंदोलन बनले. सरोजिनी नायडू सारख्या स्त्रियांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. निर्भयता आणि धैर्य ही पुरुषांचे मक्तेदारी नव्हे हजारो आज्ञा स्त्रियांमध्ये हे गुण गांधीजींनी निर्माण केले. अहिंसा सत्याग्रहाच्या चळवळीत भाग घेणाऱ्या महिलांची संख्या सशस्त्र लढा सहभागी झालेल्या स्त्रियांच्या संख्येपेक्षा कितीतरी जास्त आहे ही वस्तुस्थिती आहे. सातारा जिल्हयाने असहकार चळवळीत दिलेले योगदान या प्रकरणात मांडण्यात येणार आहे.

11.4) 1942 च्या चलेजाव आंदोलनातील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचा सहभाग

स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रियांचा सहभाग देशासाठी नव्या युगाची नांदी ठरला. तसेच स्त्रियांसाठी ही तो नवयुगाचा सूचक ठरला. चलेजाव च्या आंदोलनाने भारतीय समाजात नवचैतन्य निर्माण झाले. सातारा जिल्ह्यात सत्याग्रही स्त्रिया प्रभात फेऱ्या, प्रचार शिबीरे घेऊ लागल्या. सातारा जिल्ह्याच्या निमशहरी भागापासून ग्रामीण भागापर्यंत या आंदोलनाचा प्रसार झाला. स्वातंत्र्य संग्रामातील सहभागामुळे जीवनाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन बदलला याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

11.5) प्रतिसरकार मधील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांचे कार्य

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात सातारच्या प्रतिसरकारने वेगळा आदर्श समाजासमोर ठेवला. क्रांतिसिंह नाना पाटलांनी प्रतिसरकार स्थापन करून प्रति शासन चालविले. समाजात अन्याय करणाऱ्यावर वचक बसविला. साक्षरता सत्यशोधकी प्रसार केला. यामध्ये सातारा जिल्ह्यातील स्त्रियांनी सहभाग घेतला. भूमिगतांना श्रेय देण्यापासून ते संदेश पोहोचविणे, शिबिरे चालविणे इत्यादी कार्य त्या करू लागल्या. स्त्री शिक्षणाला गती मिळू लागली. स्त्रिया पुरुषांबरोबर प्रत्येक आंदोलनात भाग घेऊ लागल्या. या जिल्ह्यातील स्त्रियांचा त्याग, संघर्ष, धैर्य समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न या प्रकरणात करणार आहे.

11.6) सातारा जिल्ह्यातील गांधीवादी व समाजवादी स्त्रियांचे नेतृत्व

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे वेगळेपण म्हणजे एकाच प्रादेशिक क्षेत्रात एकाच ध्येयासाठी वेगवेगळ्या विचारधारेने दिलेला लढा हा आपणास पहावयास मिळतो. अनेक काँग्रेस विचारधारेचे नेतृत्व निर्माण झाली. तसेच समाजवादी विचारधारा असणारे नेतृत्व ही तयार झाली. सातारा जिल्ह्यातील स्त्रियांच्या नेतृत्वाने गांधी विचारधारेचा प्रभाव असणाऱ्या स्त्रियांनीही सत्याग्रह, मोर्चे यासाठी लागणारी विचारधारा आत्मसात केली. समाजात चालणाऱ्या अन्याय, अत्याचारा विरोधात सशस्त्र आवाज उठवत स्वतःच्या विचारधारेचे प्रशासन चालविणे, क्रांतीला

चालना देणे अशा प्रकारे आपले ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत होत्या. गांधीवादी आणि समाजवादी स्त्री नेतृत्वाचा इतिहास या प्रकरणात मांडणार आहे.

11.7) उपसंहार व निष्कर्ष

जगाच्या इतिहासाला एक मार्गदर्शक स्वातंत्र्य चळवळ म्हणून भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील स्त्रियांनी घेतलेल्या स्वातंत्र्य आंदोलनातील सहभागामुळे स्त्रियांचे झालेले सक्षमीकरण सामाजिक व कौटुंबिक निर्णय प्रक्रयेत त्यांचे वाढलेले स्थान, स्त्री शिक्षण, राजकारण व प्रशासन यांचे वाढलेले प्रमाण याचे या प्रकरणात विश्लेषण केले जाणार आहे. सातारा जिल्ह्यात झालेली असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चलेजाव आंदोलन, प्रतिसरकार व त्यांचे प्रशासन यांमध्ये महिलांचा असलेला सहभाग इयत्यादींचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच यामधून स्त्रियांची झालेली राजकीय, सामाजिक उन्नती त्यातून स्त्रीयांचे राजकीय नेतृत्व उदयास कसे आले आहे याचा आढावा या प्रकरणात घेण्यात येणार आहे.

12. संदर्भसूची

1. मोदी नवाझ, भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्रिया, मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, 2008
2. कोठेकर शांता, वैद्य सुमन, आधुनिक भारताचा इतिहास 1920-1947, साईना प्रकाशन, नागपूर, 2009
3. गेल, ऑमव्हेट, समाजातील सांस्कृतिक बंड (भाषांतर पी. डी दिघे) सुगावा प्रकाशन, पुणे, 1995
4. देव प्रभाकर, इतिहास एक शास्त्र, मालती प्रकाशन, नांदेड, पृष्ठ क्रमांक 42
5. पाटील पी. ए., राजमती पाटील, बिरनाळे एक क्रांतिकारी, मालती प्रकाशन माणगाव, 2004
6. गोखले पु. पा. प्रचित सातारा, कराड, 1861
7. शिंदे आबासाहेब, साताराचे प्रति सरकार, उषा प्रकाशन कोल्हापूर, 2003
8. बिळाशी ग्रामपंचायत रेकॉर्ड, 2006
9. पाटील रा. तु., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, क्रांती वैभव प्रकाशन, हनुमंतवडिये ता. खानापूर.
10. नलवडे दमयंती, साताराच्या प्रतिसरकार मधील स्त्रियांचा सहभाग (1942 ते 1947) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
11. सातारा जिल्हा गॅझेट, कार्यकारी संपादक सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई 1999
12. घोडके ह. म., महाराष्ट्र गाथा, राजहंस प्रकाशन, पुणे, 2000
13. जाधव विलास (संपा.), क्रांती गौरव स्मरणिका, सातारा प्रतिसरकार
14. धायगुडे राजाराम, सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.
15. पंडित नलिनी, महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास, मार्डन बुक डेपो पुणे, 1955

16. ग्रोव्हर अँड ग्रोव्हर, आधुनिक भारताचा इतिहास (अनुवाद डॉ. एन. के. वेल्हेकर), रामनगर, नवी दिल्ली, 2003
17. कुबेर वा. ना., भारताचा स्वातंत्र्यलढा, महाराष्ट्र राज्य आणि सांस्कृतिक मंडळ, 2002
18. कंटक प्रेमा, सत्याग्रही महाराष्ट्र, सुलभ ग्रंथालय पुणे, 1973
19. सारसंग्रह अर्थात केसरीचे छोटे फाईल, जंगल कायद्याविरुद्ध शेतकऱ्यांच्या तक्रारी, लेखांक दोन, केसरी मराठा ट्रस्ट, नारायण पेठ पुणे, 1930
20. चट्टोपाध्याय कमलादेवी, भारतीय स्त्री जीवन गौरवशाली कहानी भारतीय स्त्री, संपादक – श्री. नाबाणहट्टी व मो.श. शहाणे
21. Bhosale A. R., History of freedom movement in Satara district, (From 1885 to 1947) Shivaji University Kolhapur, 1978
22. Setu Madhav Rao, Maharashtra state gazetteers, Satara, 1963
23. Kunte B. G. Maharashtra state gadgets.
24. Bipin Chandra, India's struggle for independence (1857-1947)

संशोधक विद्यार्थी
विद्या युवराज कापसे
M.A., B.Ed.
मु. पो. वाटेगाव ता. वाळवा जि. सांगली

डॉ. कातळे एस. ए.
(एम. ए., एम. फिल., पीएच. डी. (इतिहास)
इतिहास विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
शहिद भगतसिंग महाविद्यालय,
किल्लारी ता. औसा जि. लातूर
(४१३५१६) महाराष्ट्र